राज्य, जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळांकरिता आणि राज्य, विभाग व जिल्हा स्तरीय संनियंत्रण कक्षाकरिता मंजूर कंत्राटी मनुष्यबळाच्या मानधनवाढीबाबत

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः डब्ल्यूक्यूएम-२०१७/ प्र.क्र.४२ / पापु-१२
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक: ०९ मे,२०१८

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः डब्ल्यूक्यूएम-२०१४/प्र. क्र. ५९/पापु-१२, दि. २३ फेब्रुवारी,२०१५
२) शासनाचे पत्र क्रमांकः डब्ल्यूक्यूएम-२०१४/प्र. क्र. ५९/पापु-१२, दि. ०३ जुलै,२०१५
३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना (Uniform Drinking Water Quality Monitoring Protocol २००८)

प्रस्तावना -

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी गुणवत्ता व संनियंत्रण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यामध्ये १ राज्यस्तरीय, ६ विभागीय, २८ जिल्हास्तरीय,१४८ उपविभागीय प्रयोगशाळा व राज्य, विभाग व जिल्हा संनियंत्रण कक्ष स्थापन करण्यास व त्यासाठी आवश्यक कंत्राटी मनुष्यबळास वाचा क्र. १ येथील दिनांक २३ फेब्रुवारी,२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजूरी देण्यात आली आहे. वाचा क्र. २ येथील दिनांक ०३ जुलै,२०१५ रोजीच्या शासन पत्रान्वये राज्य, जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळा आणि राज्य, विभाग व जिल्हा संनियंत्रण कक्षाकरीता मंजूर असलेल्या कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या मनुष्यबळाबाबत पुढीलप्रमाणे बदल करण्यात आले आहेत-

अ) राज्यातील प्रयोगशाळांकरिता मंजूर कंत्राटी मनुष्यबळ

अ.क्र	**प्रयोगशाळा स्तर/ पद**	**राज्य प्रयोगशाळा**			**जिल्हा प्रयोगशाळा**			**उपविभागीय प्रयोगशाळा**			**भरती करावयाचे एकूण पदसंख्या (अ+ब+क)**
		मंजूर	कमी करावयाचे	भरती करावयाचे एकूण (अ)	मंजूर	कमी करावयाचे	भरती करावयाचे एकूण (ब)	मंजूर	कमी करावयाचे	भरती करावयाचे एकूण (क)	
१.	रसायनी	२	०	२	३४	०	३४	१४८	०	१४८	१८४
२.	अनुजैविक तज्ञ	१	०	१	३४	०	३४	१४८	०	१४८	१८३

३.	प्रयोगशाळा सहायक	३	१	२	६८	३४	३४	२९६	१४८	१४८	१८४
४.	डाटा एन्ट्री ऑपरेटर	२	१	१	३४	३४	०	१४८	१४८	०	०१
५.	प्रयोगशाळा मदतनीस	२	०	२	३४	०	३४	१४८	०	१४८	१८४
	एकूण	१०	२	८	२०४	६८	१३६	८८८	२९६	५९२	७३६

ब) राज्यातील संनियंत्रण कक्षाकरिता मंजूर कंत्राटी मनुष्यबळ

अ.क्र.	**प्रयोगशाळा स्तर/ पद**	**राज्य**			**विभागीय**			**जिल्हा**			**भरती करावयाचे एकूण पदसंख्या (अ+ब+क)**
		मंजूर	कमी करावयाचे	भरती करावयाचे एकूण (अ)	मंजूर	कमी करावयाचे	भरती करावयाचे एकूण (ब)	मंजूर	कमी करावयाचे	भरती करावयाचे एकूण (क	
१.	रसायनी	२	१	१	६	०	६	३४	०	३४	४१
२.	डाटा एन्ट्री ऑपरेटर	२	१	१	१२	६	६	६८	३४	३४	४१
३.	मदतनीस	२	२	०	६	६	०	३४	३४	०	०
	एकूण	६	४	२	२४	१२	१२	१३६	६८	६८	८२

सदर कंत्राटी मनुष्यबळास मा. अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ०५.०१.२०१८ रोजीच्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने सुधारित मानधन लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी गुणवत्ता व संनियंत्रण कार्यक्रमांतर्गत कायमस्वरुपी अधिकारी/ कर्मचारी यांच्याव्यतिरिक्त प्रस्तावनेमध्ये नमूद केल्यानुसार राज्य, जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळा आणि राज्य, विभाग व जिल्हा संनियंत्रण कक्षाकरीता मंजूर असलेल्या कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या एकूण ८१८ पदांना द्यावयाचे मानधनाबाबत मा. अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक ०५.०१.२०१८ रोजीच्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

अ.क्र.	पद	शासन निर्णय दिनांक २३ फेब्रुवारी,२०१५ अन्वये अनुज्ञेय मानधन (रु.)	सुधारित मानधन (रु.) (एप्रिल २०१८ पासून अनुज्ञेय)
१.	रसायनी	१२०००	१५०००
२.	अनुजैविक तज्ञ	१२०००	१५०००
३.	प्रयोगशाळा सहायक	८०००	१००००
४.	डाटा एन्ट्री आपरेटर	१००००	१२५००
५.	प्रयोगशाळा मदतनीस	६०००	७५००

सदर सुधारित मानधन एप्रिल, २०१८ पासून लागू करण्यात येत आहे. सुधारित मानधन वितरण तसेच मानधन अदायगी, या विभागाच्या दिनांक २३ फेब्रुवारी,२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात यावे.

सदर कंत्राटी मनुष्यबळाची भरती व निवड प्रक्रिया,नेमणूक आदेश,कर्तव्ये व जबाबदा-या, कंत्राटी पदांचे मूल्यमापन,करारनामा,अनुज्ञेय रजा, प्रवास व दैनिक भत्ता राजीनामा, मानधन अदायगी व सेवा, निधी वितरण व उपयोगिता प्रमाणपत्र इ.बाबत या विभागाच्या दिनांक २३ फेब्रुवारी,२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार तरतुदी लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०९१२२३१४१२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vasant Bhimrao Mane

Digitally signed by Vasant Bhimrao Mane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=280e2beac20f526041fee94f6226522e1407a7f6aa0b06c8769634d48c2976bc, cn=Vasant Bhimrao Mane
Date: 2018.05.09 14:02:43 +05'30'

(वसंत भि. माने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

२) सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

३) उप सचिव व संचालक, (आर.एस.पी.एम.यु) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई.

४) विभागीय आयुक्त (सर्व)

५) संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.

६) मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद (सर्व)

७) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर, नरीमन पॉईट, मुंबई.

८) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.

९) मुख्य अभियंता, राज्यस्तरीय भारत निर्माण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई.

१०) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर

११) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई.

१२) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)

१३) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)

१४) कार्या. पापु-१०/कार्या. पापु-०४/कार्या.पापु-२० पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५) निवड नस्ती पापु-१२